जलयुक्त शिवार अभियान, लेखाशिर्ष ४४०२
२७८१ खालील निधी वितरीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

### शासन निर्णय क्रमांकः जशिअ- २०१८/प्र.क्र.१५५/जल-७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जलअ-२०१४ /प्र. क्र. २०३/ जल -७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४
२. शासन निर्णय, मृद व जलसंधारण विभाग, क्रमांक: जलसं - २०१८ / प्र. क्र. १३९ / जल-७, दिनांक ३ एप्रिल, २०१८

<u>प्रस्तावना: -</u>

सर्वासाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र -२०१९ अंतर्गत शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर २०१८ अन्वये राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेली सर्व ६२०२ गावे जलपरिपुर्ण झालेली आहेत. सन २०१६ - १७ मध्ये ५२८८ गावे व  सन २०१७-१८ मध्ये ५०३१ गावे निवडण्यात आलेली असून या गावामधील कामे करण्यास दिनांक ३० जून २०१८ पर्यंत मुदत आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये ६२०० गावांचे उदिष्ट निश्चित करण्यात आले असून यामध्ये कामे करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरविण्यात आलेला आहे.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये निवड करण्यात आलेल्या गावातील कामांकरिता निधी उपलब्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

जलयुक्त शिवार योजनेसाठी लेखाशिर्ष ४४०२ २७८१ खाली सन २०१८-१९ करिता रु.१५००.०० कोटी एवढी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. त्यापैकी वित्त विभागाने ७० टक्के तरतूद अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि सनियंत्रण (BEAMS) प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करून दिलेली आहे.

२. सदर तरतूदी पैकी जलयुक्त शिवार अभियान करिता सोबत जोडलेल्या **परिशिष्टाप्रमाणे** प्रमाणे **रु .१०००.०० कोटी** (अक्षरी रुपये एक हजार कोटी ) तरतुद व सन २०१८-१९ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गावातील प्रतिनिधीचे प्रशिक्षण व त्यांना प्रशिक्षण देण्या-या संस्थास प्रशिक्षण देण्याकरिता **रु. ५.०० कोटी** (अक्षरी रुपये पाच कोटी) तरतूद अशी एकुण ₹१००५.०० कोटी (₹ एक हजार पाच कोटी) तरतूद वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. जलयुक्त शिवार अभियानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता ₹ १०००.०० कोटी (रुपये एक हजार कोटी) तरतुद जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येत असून विभागिय आयुक्त यांना नियंत्रक अधिकारी व जिल्हाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. वितरीत करण्यात येत असलेल्या तरतुदीतून खर्च करताना खालील अटीं व शर्तींचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

३.१ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात येत असलेली तरतूद जिल्हाधिकारी यांनी कार्यान्वयीन/संबधित यंत्रणांना अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि सनियंत्रण (BEAMS) प्रणालीवर (आहरीत करून वर्ग न करता) उपलब्ध करून द्यावी.

३.२ या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेली तरतूद जलयुक्त शिवार अभियान सन २०१६ -१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये निवडलेल्या गावातील कामांसाठी खर्च करावी.

३.३. तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेसाठी व शासन निर्णय दिनांक ३ एप्रिल, २०१८ नुसार पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धा सन २०१८-१९ मध्ये सहभागी होणा-या गावासाठी तरतूद उपलब्ध करून द्यावी.

३.३ जलयुक्त शिवार अभियान करिता जास्तीत जास्त निधी अभिसरणातून प्राप्त करून घ्यावा व तदनंतरच सदर विशेष निधी वापरावा.

३.४ उपलब्ध करून देण्यात येत असलेली तरतूद तात्काळ खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी.

३.५ जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जलयुक्त शिवार अभियान जिल्हास्तरीय कार्यकारी समिती यांनी खर्च ताळमेळ व इतर वित्तीय बाबीच्या समन्वयाची जबाबदारी पार पाडणाच्या दृष्टीने आवश्यक उपायोजना कराव्यात.

३.६ उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीमधून झालेल्या खर्चाचे गाव निहाय व वर्षनिहाय विवरणपत्र शासनास सादर करावे .

४. सन २०१८-१९ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गावातील प्रतिनिधीचे प्रशिक्षण व त्यांना प्रशिक्षण देण्या-या संस्थास प्रशिक्षण देण्याकरिता ₹ ५.०० कोटी (रुपये पाच कोटी) तरतूद आहरन व संवितरण अधिकारी म्हणुन संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे /अप्पर आयुक्त, मृदसंधारण यांना वितरीत करण्यात येत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक यांनी शासनास सादर करावा.

५. सदर निधी मागणी क्रमांक झेड एच ५, ४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, ०० १०२ मृद संधारण, ०२ जलयुक्त शिवार अभियान, (०२ ) (०१) जलयुक्त शिवार अभियान (४४०२ २७८१ ), ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं - २०१८/ प्र.क्र.६९/ अर्थसंकल्प-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत असून या परिपत्रकामधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१९११०४२३५१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh
Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2018.04.19 14:56:41 +05'30'

**( सु. द. नाईक )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद व विधानसभा, विधान भवन, मुंबई
९. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
११.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१४. आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद
१५.विभागीय आयुक्त, सर्व
१६.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे/अप्पर आयुक्त मृदसंधारण
१७.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे/ अप्पर आयुक्त जलसंधारण
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.जिल्हाधिकारी, सर्व
२०.अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,/ प्रादेशिक जलसंधारण अधिकारी सर्व

२१.विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
२२.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२४.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर
२५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
२६. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व
२७.कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण)/जिल्हापरिषद, / जिल्हा जलसंधारण अधिकारी सर्व
२८. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
२९.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३१. निवडनस्ती जल-७.

| जलयुक्त शिवार अभियान निधी वितरण | | |
|---|---|---|
| शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल २०१८ चे परिशिष्ट | | |
| अ.क्र | जिल्हा | वितरीत करावयाची तरतूद ₹ कोटी |
| १ | ठाणे | ८.५६ |
| २ | पालघर | १४.८० |
| ३ | रायगड | १८.९८ |
| ४ | रत्नागिरी | ६.६० |
| ५ | सिंधूदूर्ग | ५.२६ |
| **एकूण ठाणे विभाग** | | **५४.२०** |
| ६ | पुणे | ४१.०० |
| ७ | सातारा | ३६.५४ |
| ८ | सांगली | २१.३९ |
| ९ | सोलापुर | ४५.९० |
| १० | कोल्हापुर | ८.७३ |
| **एकूण पुणे विभाग** | | **१५३.५६** |
| ११ | नाशिक | ४४.६५ |
| १२ | धुळे | २३.०० |
| १३ | नंदुरबार | २२.६४ |
| १४ | जळगाव | ३९.५७ |
| १५ | अहमदनगर | ४३.६७ |
| **एकूण नाशिक विभाग** | | **१७३.५३** |

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2018.04.19 14:56:56 +05'30'

(सु. द. नाईक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

| जलयुक्त शिवार अभियान निधी वितरण | | |
|---|---|---|
| शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल २०१८ चे परिशिष्ट | | |
| **अ.क्र** | **जिल्हा** | **वितरीत करावयाची तरतूद ₹ कोटी** |
| १६ | औरंगाबाद | ३९.९३ |
| १७ | जालना | ३४.९५ |
| १८ | बीड | ३८.३२ |
| १९ | परभणी | २०.९४ |
| २० | हिंगोली | १६.२२ |
| २१ | नांदेड | ३६.५४ |
| २२ | लातुर | २६.०२ |
| २३ | उस्मानाबाद | २३.०८ |
| **एकूण औरंगाबाद विभाग** | | **२३६.००** |
| २४ | अमरावती | ४९.६४ |
| २५ | अकोला | २६.३८ |
| २६ | यवतमाळ | ६४.४४ |
| २७ | बुलडाणा | ४०.११ |
| २८ | वाशिम | २७.५४ |
| **एकूण अमरावती विभाग** | | **२०८.११** |
| २९ | नागपुर | ३८.९५ |
| ३० | भंडारा | १७.४७ |
| ३१ | गोंदीया | १८.८९ |
| ३२ | चंद्रपुर | ४१.७१ |
| ३३ | गडचिरोली | २७.७२ |
| ३४ | वर्धा | २९.८६ |
| **एकूण नागपुर विभाग** | | **१७४.६०** |
| **एकूण महाराष्ट्र** | | **१०००.००** |

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2018.04.19 14:57:10 +05'30'

(सु. द. नाईक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन